# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 August 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठी उद्याची नीट पीजी रद्द करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली
- जालना-अजिंठा-जळगाव या नवीन लोहमार्गासाठी सात हजार १०५ कोटी रुपये खर्चाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- हर घर तिरंगा अभियानाला कालपासून सर्वत्र प्रारंभ

आणि

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीपटू अमन सेहरावतला कांस्यपदक

****

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठी उद्या ११ ऑगस्टची नियोजित नीट पीजी रद्द करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली आहे. पूर्वी २३ जून रोजी नियोजित असलेली ही परीक्षा केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं इतर स्पर्धा परीक्षांमध्ये अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता, त्यानुसार उद्या रविवारी देशभरात नियोजित ५०० केंद्रांवर वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठी ही परीक्षा होणार आहे.

****

संसदेचं पावसाळी अधिवेशन काल अनिश्चित काळासाठी तहकूब झालं. या अधिवेशनात लोकसभेत ११५ तास तर राज्यसभेत ९० तास कामकाज झालं. लोकसभेत एकूण १२ विधेयकं सादर झाली, यापैकी वित्त विधेयक तसंच वायूयान विधेयकासह चार विधेयकं सदनानं मंजूर केली. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत रेल्वे दुरुस्ती विधेयक २०२४ काल सादर केलं.

****

वक्फ सुधारणा विधेयकाच्या समीक्षेसाठी संयुक्त संसदीय समितीच्या सदस्यांच्या नावाची, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी काल घोषणा केली. यामध्ये लोकसभेतल्या २१ तर राज्यसभेच्या दहा सदस्यांचा समावेश आहे. ही समिती लोकसभेच्या आगामी सत्राच्या पहिल्या आठवड्याच्या अखेरीस आपला अहवाल सादर करेल.

****

जालना–अजिंठा–जळगाव या नवीन लोहमार्गासाठी सात हजार १०५ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी मिळाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने कालच्या बैठकीत हा निर्णय घेतला. मराठवाड्याला थेट उत्तर भारताशी जोडणाऱ्या या रेल्वे मार्गास केंद्र सरकारची मंजूरी मिळाल्यानंतर आता भूसंपादनासह पुढील प्रक्रिया सुरू होण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. या रेल्वेमार्गामुळे जालना लोकसभा मतदारसंघाचा संपूर्ण कायापालट होऊन पर्यटनक्षेत्रातही मोठी वाढ होणार आहे.

दरम्यान, कालच्या बैठकीत अनुसुचित जाती जमाती आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाबाबत चर्चा झाली. हे आरक्षण संविधानातल्या तरतुदींनुसारच असावं, अशी सरकारची भूमिका असल्याचं, केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

****

हर घर तिरंगा अभियान कालपासून सुरु झालं. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. या अभियानानं लोकचळवळीचं स्वरूप घेतलं असून यावर्षी राज्यातल्या अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकवला जाणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

त्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी काल ऑगस्ट क्रांतिदिनी मुंबईतल्या ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदानात हुतात्मा स्मृती स्तंभावर अभिवादन केलं. तिरंगा कॅनव्हास वर स्वाक्षरी करून घरोघरी तिरंगा अभियानाच्या सेल्फी पॉईंटवर त्यानीं सेल्फी घेतला.

मराठवाड्यात लातूर, जालना, नांदेड, बीड, हिंगोली, आणि धाराशिव सह सर्वत्र तिरंगा रॅलीसह अनेक कार्यक्रम उपक्रम घेण्यात आले. सर्व नागरिकांनी राष्ट्रध्वजाचं पावित्र्य राखून यात सहभागी होण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

**

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल शहरातल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेतली. युवासंवाद, मतदार नोंदणी आणि जाणीवजागृती अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून हे अभियान राबवावं, विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे संस्कार रुजवण्यासाठी सर्व शाळा महाविद्यालयांनी या अभियानात सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केलं.

**

दरम्यान, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने काल ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शहरातल्या महापुरुषांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

****

आदिवासी दिन काल सर्वत्र साजरा करण्यात आला. आदिवासी विकास मंत्री डॉ विजयकुमार गावित यांनी काल नंदुरबार इथं राज्यस्तरीय कार्यक्रमात मार्गदर्शन केलं. नागपूर, गोंदिया, गडचिरोली, पालघर आदी जिल्ह्यांतही आदिवासी दिन साजरा झाला.

**

हिंगोली शहरातल्या क्रांतीसूर्य बिरसा मुंडा चौकात जागतिक आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काल आंदोलन करण्यात आलं.

****

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू अमन सेहरावत यानं काल ५७ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावलं. अमनने पुर्तोरिकोच्या प्रतिस्पर्धी मल्लावर १३-५ अशा फरकाने मात केली.

या स्पर्धेत आज महिलांच्या कुस्ती स्पर्धेत ७६ किलो वजन गटात रितिका हुड्डा सहभागी होणार आहे, तर गोल्फ स्पर्धेत भारताच्या आदिती अशोक आणि दीक्षा डागर चौथ्या फेरीचा सामना खेळणार आहेत.

दरम्यान, या स्पर्धेचा उद्या समारोप होत आहे. समारोप सोहळ्यात नेमबाज मनू भाकर आणि हॉकी गोलरक्षक पी आर श्रीजेश यांची भारतीय पथकात ध्वजवाहक म्हणून निवड करण्यात आली आहे.

****

आयसिसशी संबंधित दहशतवाद्याला दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं काल पुण्यातून अटक केली. रिजवान अली असं त्याचं नाव असून राष्ट्रीय तपास संस्था – एनआयएनं त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

****

मनसे अध्यक्ष राज ठाकरे काल बीड जिल्हा दौऱ्यावर दाखल झाले, यावेळी शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे गटाचे शिवसैनिक आणि मनसैनिकांमध्ये तणाव निमार्ण झाला होता. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचं, क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी म्हटलं आहे. जळकोट तालुक्यातील घोणसी इथं प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत भूमिपूजनप्रसंगी काल ते बोलत होते.

उदगीर इथल्या उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचं बनसोडे यांच्या हस्ते काल उद्घाटन झालं.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रनिहाय तपासणी करण्यासोबतच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदार नावनोंदणी, आणि इतर कामं मिशन मोडवर करण्याचे निर्देश परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले आहेत. काल परभणी इथं एका आढावा बैठकीत ते बोलत होते.

****

हिंगोली जिल्ह्यात आज आणि उद्या विशेष मतदार नोंदणी अभियान राबवलं जात आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी सर्व मतदारांना केलं आहे.

****

प्रहार संघटनेतर्फे, आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात काल छत्रपती संभाजीनगर शहरात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. दिव्यांग तसंच कष्टकऱ्यांच्या मागण्या येत्या ५ सप्टेंबर पर्यंत मान्य न झाल्यास २२ सप्टेंबरला मुंबईत मोर्चा काढणार अस्ल्याचं इशारा आमदार बच्चू कडू यांनी यावेळी दिला.

****

लातूर इथं महसूल पंधरवाड्याअंतर्गत आज सर्व तहसील कार्यालयांमध्ये 'सैनिकहो तुमच्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये तहसीलदार आणि महसूल अधिकारी, कर्मचारी हे आजी माजी सैनिकाच्या महसूल संबंधी तक्रारीचा आढावा घेवून त्यावर आवश्यक कार्यवाही करणार आहेत.

****